2025 VII 05 - 1100

२०२५ . ०७ . ०५ - ११००

N 727

Seat No.
बैठक क्र. | | | | | | | |

Time : 2 Hours SOCIAL SCIENCES (73) HISTORY & POLITICAL SCIENCE—PAPER–I (M)

वेळ - २ तास सामाजिक शास्त्रे (७३) इतिहास व राज्यशास्त्र—पेपर-१ (म)

(REVISED COURSE)

Pages - 11 Total Marks : 40

पृष्ठे - ११ एकूण गुण - ४०

सूचना :— (1) *सर्व* कृती/प्रश्न सोडविणे आवश्यक आहेत.

(2) उजवीकडील अंक प्रश्नांचे/कृतींचे पूर्ण गुण दर्शवितात.

(3) प्रश्न क्रमांक 1 ते 5 प्रश्न/कृती इतिहास व प्रश्न क्रमांक 6 ते 9 प्रश्न/कृती राज्यशास्त्र या विषयांवरील आहेत.

(4) प्रश्न क्रमांक 1(अ) आणि 6 या कृती/प्रश्नांमध्ये संपूर्ण विधान लिहिणे आवश्यक आहे.

(5) प्रश्न क्रमांक 2(अ) आणि 8(ब) मधील संकल्पनाचित्रे त्याच नमुनाकृती आराखड्यानुसार पेनाने उत्तरपत्रिकेत तयार करणे अपेक्षित आहे.

(6) प्रश्न 1(अ), (ब) आणि प्रश्न क्रमांक 6 या प्रश्नांची उत्तरे उत्तरपत्रिकेत एकापेक्षा जास्त वेळ लिहिलेले असेल तर प्रथम लिहिलेले उत्तर हे गुणांसाठी गृहीत धरले जाईल.

P.T.O.

1. (अ) दिलेल्या पर्यायांपैकी योग्य पर्याय निवडून विधाने पूर्ण करा : 3

(1) लिओनार्दो द विंची या जगप्रसिद्ध इटालियन चित्रकाराने रेखाटलेल्या .... या चित्राचा समावेश लुव्र संग्रहालयात आहे.

(अ) नेपोलियन

(ब) मोनालिसा

(क) हॅन्स स्लोअन

(ड) दुसरा जॉर्ज

(2) महाराष्ट्राचे आद्य कीर्तनकार .... यांना मानले जाते.

(अ) संत ज्ञानेश्वर

(ब) संत तुकाराम

(क) संत नामदेव

(ड) संत एकनाथ

(3) हेगेल याने लिहिलेले .... हे पुस्तक प्रसिद्ध आहे.

(अ) द सिक्रेट ऑफ वर्ल्ड हिस्टरी

(ब) रिझन इन हिस्टरी

(क) आर्केयॉलॉजी ऑफ नॉलेज

(ड) डिसकोर्स ऑन द मेथड

(ब) पुढीलपैकी प्रत्येक गटातील चुकीची जोडी ओळखून लिहा : **3**

(1)	(*i*)	मल्लखांब	–	शारीरिक कसरतीचे खेळ
	(*ii*)	वॉटर पोलो	–	पाण्यातील खेळ
	(*iii*)	स्केटींग	–	साहसी खेळ
	(*iv*)	बुद्धिबळ	–	मैदानी खेळ
(2)	(*i*)	लाल किल्ला	–	मुंबई
	(*ii*)	जंतर मंतर	–	जयपूर
	(*iii*)	रानी-की-बाव	–	पाटणे
	(*iv*)	कॅपिटल कॉम्प्लेक्स	–	चंडिगढ
(3)	(*i*)	पंडिता रमाबाई	–	द हाय कास्ट हिंदू वुमन
	(*ii*)	रखमाबाई	–	भारतातील पहिल्या कार्यरत स्त्री डॉक्टर
	(*iii*)	ताराबाई शिंदे	–	हू वेअर द शूद्राज
	(*iv*)	मीरा कोसंबी	–	स्त्रीवादी लेखन

2. (अ) **दिलेल्या सूचनेनुसार कृती करा (कोणत्याही दोन) :** 4

(1) पुढील संकल्पनाचित्र पूर्ण करा :



(2) पुढील संकल्पनाचित्र पूर्ण करा :



(3) पुढील तक्ता पूर्ण करा :

1.	....	कथ्थक
2.	महाराष्ट्र	....
3.	....	भरतनाट्यम
4.	केरळ	....

(ब) थोडक्यात टिपा लिहा (कोणत्याही *दोन*) : **4**

(1) विश्वकोश

(2) उपयोजित इतिहास

(3) प्रसारमाध्यमांशी संबंधित व्यावसायिक क्षेत्र.

3. पुढील विधाने सकारण स्पष्ट करा (कोणतीही *दोन*) : **4**

(1) विविध विषयांमधील कृतींसाठी प्रशिक्षणाची आवश्यकता असते.

(2) स्त्रियांच्या आयुष्याशी संबंधित विविध पैलूंवर विचार करणारे संशोधन सुरू झाले.

(3) बखर हा ऐतिहासिक साहित्यातील महत्त्वाचा प्रकार आहे.

(4) माहितीचा मुक्त प्रवाह समाजात पसरविण्यासाठी प्रसारमाध्यमांची आवश्यकता असते.

4. दिलेल्या उताऱ्याचे वाचन करून त्याखालील प्रश्नांची उत्तरे लिहा : 4

भारतातील पहिले आगळेवेगळे 'पुस्तकांचे गाव'

महाबळेश्वर येथून जवळच असलेले भिलार हे निसर्गरम्य आणि स्ट्रॉबेरीचा गोडवा असलेले गाव. या पुस्तकाच्या गावामध्ये अनेक घरांत पर्यटकांसाठीच पुस्तके आहेत. वाचन चळवळ वाढावी, मराठी भाषेतील नवे-जुने लेखक, संत साहित्य, कथा-कादंबरी, कविता, ललित, चरित्रे-आत्मचरित्रे, स्त्री साहित्य, क्रीडा, बालसाहित्य यांच्या फुललेल्या बहारदार विश्वात तुम्ही 'वाचन-आनंद' घ्यावा, यासाठी महाराष्ट्र शासनाने हा प्रकल्प राबविला आहे.

आपण पर्यटनासाठी महाबळेश्वरला गेला तर भिलार गावाला म्हणजेच पुस्तकांच्या गावाला अवश्य भेट द्या.

प्रश्न :

(1) पुस्तकाच्या गावाचे नाव सांगा. 1

(2) महाराष्ट्र शासनाचे कोणता प्रकल्प राबविला आहे ? 1

(3) पुस्तकांच्या गावाविषयी आपले मत मांडा. 2

5. पुढील प्रश्नांची सविस्तर उत्तरे लिहा (कोणतेही *दोन*) : 6

(1) मार्क्सवादी इतिहासलेखन म्हणजे काय ?

(2) दशावतारी नाटके या सांस्कृतिक लोकपरंपरेविषयी माहिती लिहा.

(3) खेळ आणि इतिहास यांच्यातील परस्परसंबंध स्पष्ट करा.

(4) आकाशवाणीचा इतिहास स्पष्ट करा.

6. दिलेल्या पर्यायांपैकी योग्य पर्याय निवडून विधाने पूर्ण करा : **2**

(1) भारतीय संविधानाने सध्या मतदाराचे वय .... निश्चित केले आहे.

(अ) 16

(ब) 17

(क) 18

(ड) 21

(2) .... मधील संथाळ, मुंडा आदिवासींनी मोठ्या प्रमाणात उठाव केला.

(अ) छोटा नागपूर

(ब) ओडिशा

(क) महाराष्ट्र

(ड) बिहार

7. **पुढील विधाने चूक की बरोबर ते सकारण स्पष्ट करा (कोणतीही *दोन*) :** **4**

(1) राजकीय पक्ष शासन व जनता यांच्यातील दुवा म्हणून काम करतात.

(2) डाव्या उग्रवादी चळवळीत आज शेतकरी व आदिवासी यांच्या समस्यांचे महत्त्व वाढत आहे.

(3) स्वातंत्र्योत्तर काळापासून महिला सक्षमीकरणाच्या प्रयत्नांना सुरुवात झाली.

8. **(अ) पुढील संकल्पना स्पष्ट करा (कोणतीही *एक*) :** **2**

(1) माहितीचा अधिकार

(2) भ्रष्टाचार.

(ब) दिलेल्या सूचनेनुसार कृती करा (कोणतीही एक) : **2**

(1) दिलेला आकृतीबंध पूर्ण करा :



(2) पुढील संकल्पनाचित्र पूर्ण करा :



9. पुढील प्रश्नाचे थोडक्यात उत्तरे लिहा (कोणतेही एक) : **2**

(1) निवडणूक आयुक्त पदाविषयी माहिती लिहा.

(2) पर्यावरण चळवळीचे कार्य स्पष्ट करा.